# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:07.04.2025** **वारःसोमवार**

1. देशात पायाभूत सुविधा उभारण्यावर केंद्र सरकारचा भर असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
2. तामिळनाडूमध्ये रामेश्वरम इथ पंबन रेल्वे पुलाचं पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन
3. अयोध्येसह देशभरात श्रीरामनवमी उत्साहात साजरी; राज्यातही ठीकठिकाणी रामजन्म सोहळा उत्साहात आणि
4. चंद्रपूर जिल्ह्यातील सादागड-हेटी गाव ठरलं; राज्यातलं पहिलं आदिवासी सौर ग्राम

**<u>पंतप्रधान</u>**

केंद्र सरकारनं गेल्या दहा वर्षात देशाची चारही टोकं जोडण्यासाठी पायाभूत सुविधा उभारण्यावर मोठ्या प्रमाणावर भर दिला आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. तामीळनाडूमध्ये रामेश्वरम इथं vertical lift sea bridge म्हणजे समुद्रावरच्या उघडता येऊ शकणाऱ्या पंबन रेल्वे पुलाचं उद्घाटन काल पंतप्रधानांच्या हस्ते झालं; त्यानंतर झालेल्या एका जाहीर सभेत ते बोलत होते. तामीळनाडूमधील 8 हजार 300 कोटी रुपयांच्या रेल्वे आणि रस्ते प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पणही मोदी यांच्या हस्ते झालं. यावेळी पंतप्रधानांनी vertical lift पुलाखालून जाणाऱ्या पहिल्या जहाजाला, तसंच या पुलावरून जाणाऱ्या रामेश्वरम तांबरम एक्सप्रेसला देखील हिरवा झेंडा दाखवला. यानंतर त्यांनी रामनवमीच्या निमित्तानं रामेश्वरम मंदिरात जाऊन दर्शनही घेतलं.

**<u>रामनवमी</u>**

श्रीरामनवमीचा सण काल देशभरात अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. अयोध्येतील श्रीराम मंदिरात दुपारी बारा वाजता श्रीरामलल्लाच्या कपाळावर सूर्यतिलक अर्थात सूर्यकिरणांचा अभिषेक झाला. सुमारे चार मिनिटांसाठी हा दुर्मिळ योग साधला गेला.

राज्यातही श्रीरामनवमीचा सण काल पारंपरिक पद्धतीनं, उत्साहात साजरा करण्यात आला. नाशिकच्या श्री काळाराम मंदिरात काल दुपारी बारा वाजता श्रीरामनामाचा जयघोष करत टाळ, मृदंग वाजवून आणि गुलालाची उधळण करत रामजन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. नागपूर इथल्या श्री पोद्दारेश्वर राम मंदिराच्या प्रांगणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रभू श्रीराम, सीतामाता आणि लक्ष्मणाच्या मूर्तीचं पूजन केल्यानंतर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि सर्वपक्षीय आमदारांच्या हस्ते श्रीराम पंचायतनाचं पूजन करण्यात आलं. पुण्यातील तुळशीबागेतल्या पेशवेकालीन श्रीराम मंदिरात चैतन्यमय वातावरणात रामजन्मोत्सव साजरा झाला. यानिमित्तानं मंदिराला फुलांची आकर्षक आरास आणि विद्युतरोषणाई करण्यात आली आहे. शिर्डी इथल्या श्री रामनवमी उत्सवाच्या मुख्य दिवशी काल अखंड पारायण समाप्तीनंतर श्रींचे फोटो, पोथी आणि वीणेची मिरवणूक काढण्यात आली. अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जालना, गोंदिया, नांदेड, अकोला, रत्नागिरीसह राज्यात अन्य ठिकाणीही काकड आरती तसंच इतर धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे रामनवमी साजरी करण्यात आली. सिंधूदुर्गात दशावतारी नाटकांनी रात्री जागवण्यात आल्या.

**<u>चंद्रपूर आदिवासी गाव</u>**

चंद्रपूर जिल्ह्यातील सावली तालुक्यातील सादागड-हेटी गाव, राज्यातलं पहिलं आदिवासी सौर ग्राम ठरलं आहे; ऐकुया त्याबाबत अधिक वृत्तांत....

**चंद्रपूर जिल्ह्यातील सावली तालुक्यातील सादागड-हेटी हे गाव राज्यातील पहिले आदिवासी सौरग्राम झाले आहे. गावात वीज जोडणीसाठी एक शाळा आणि एकूण 19 घरांचा समावेश आहे. 'प्रधानमंत्री सौर्यघर मोफत योजना'अंतर्गत प्रति किलोवॅट 30 हजार रुपये अनुदानाचा लाभ घेऊन गावातील 19 घरांच्या छतांवर प्रति 1 किलोवॅटचे सौर प्रकल्प बसविण्यात आले आहेत. त्याचबरोबर शाळेसाठीही 1 किलोवॅटचा स्वतंत्र सौर प्रकल्प (विना अनुदान) बसविण्यात आला आहे. एकूण 20 किलोवॅटची सौर यंत्रणा बसविण्यात आल्यामुळे महिन्याला सरासरी 2400 युनिट वीज निर्मिती होत असून, त्यामुळे या आदिवासीबहुल गावात ग्रामस्थांचे जीवनमान अधिक सुखकर झाले आहे. अवघ्या 20 दिवसांत सर्व अडचणी दूर करून गाव पूर्णतः सौरग्राम बनले आहे. या उपक्रमात जिल्हा प्रशासन आणि महावितरण यांनी मोलाची भूमिका बजावली आहे.या योजनेबाबत अधिक माहिती घेतली कार्यकारी अभियंता चंद्रशेखर दार्वेकर यांच्याकडून....**

**'2400 युनिट वीज दरमहा संपूर्ण गावासाठी तयार होते आहे. ही वीज गावासाठी अतिशय फायदेशीर ठरत आहे. आणि विशेष म्हणजे, इथल्या लाभार्थ्यांनी उत्स्फूर्त या योजनेत सहभाग नोंदवला.'**

**तसेच स्थानिक गावकरी श्रीकांत सोयम हे सौर प्रकल्पाबाबत माहिती देताना सांगतात....**

**'आधी आम्हाला जे वीज बिल येत होते, ते खूप जास्त होते. उन्हाळ्याच्या दिवसांत 1700 किंवा 1800 रुपये बिल येत होते. त्यामुळे ते बिल भरताना त्रास होत होता. आता सोलर आल्यामुळे बिल 0 रुपये येत आहे.'**

**"गाव करी ते राव न करी" अशी एक म्हण आहे. ग्रामस्थांनी सौरग्राम बनवण्याचा घेतलेला एकत्रित निर्णय केवळ ऊर्जा बचतीपुरता मर्यादित न राहता, प्रत्यक्षात पैशांची बचत करणारा ठरला आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी,मंगेश बेले, चंद्रपूर.**

**सौर ऊर्जा-परभणी**

परभणीचं महावितरणचं कार्यालय; प्रधानमंत्री सौर्य घर योजने अंतर्गत सौर ऊर्जा कार्यान्वित करणारं राज्यातलं पहिलं महावितरण कार्यालय ठरणार आहे; लवकरच याचा प्रारंभ होईल असं महावितरणचे कार्यकारी संचालक डी. आर. औंढेकर यांनी सांगितलं. परभणीच्या महावितरण मंडळ कार्यालयाच्या छतावर 35 किलो वॅटचा सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसवण्यात आला आहे; या प्रकल्पाची पाहणी केल्यानंतर ते काल बोलत होते. बेरोजगार तरुणांनी सोलर टेंडर व्यवसायात स्वतःचा व्यवसाय सुरू करून रोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात असं आवाहन औंढेकर यांनी यांनी यावेळी केलं.

**जागतिक आरोग्यदिन-वाशिम**

सर्वांसाठी आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि आरोग्य विषयक जनजागृती व्हावी या उद्देशानं 7 एप्रिल हा दिवस जागतिक आरोग्य दिन म्हणून साजरा केला जातो. "निरोगी सुरुवात, आशादायक भविष्य" ही यंदाच्या जागतिक आरोग्य दिनाची संकल्पना आहे. माता आणि नवजात बालकांच्या आरोग्यावर लक्ष केंद्रित करणं हा या संकल्पनेमागचा हेतू आहे. जागतिक आरोग्य दिनानिमित्त राज्यभरात अनेक जनजागृतीपर कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. वाशिममध्ये श्री बाकलीवाल विद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी काल अवयव दानाची शपथ घेतली आणि जनजागृती केली. 'अवयव दान श्रेष्ठ दान' या विषयावर पोस्टर स्पर्धाही आयोजित करण्यात आली होती.

**भाजपा-स्थापनादिन**

भारतीय जनता पार्टीचा 45 वा स्थापना दिन काल देशभरात साजरा करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा यांनी स्थापना दिनानिमित्त पक्ष कार्यकर्त्यांना शुभेच्छा दिल्या. भाजपा कार्यकर्त्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून पक्ष उभारणीसाठी केलेले कठोर परिश्रम, संघर्ष आणि त्यागाबद्दल पंतप्रधानांनी त्यांचे आभार मानले. भारताची प्रगती तसंच विकसित भारताचं स्वप्न साकार करण्याप्रती वचनबद्धता अधोरेखित करताना हा दिवस महत्त्वाचा असल्याचंही ते म्हणाले.

भाजपच्या स्थापना दिनी नागपूर इथं काल पक्षाच्या कार्यालयाचं भूमिपूजन झालं. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी तसंच भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. भविष्यात हे कार्यालय सामाजिक-आर्थिक परिवर्तनाचे केंद्र ठरणार आहे, असा विश्वास नितीन गडकरी यांनी यावेळी व्यक्त केला.

अहिल्यानगर इथं भाजपच्या स्थापना दिनी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं, तर नांदेडमध्ये काल नांदेड महानगर भाजप कार्यालयात माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आलं. राज्यात तसंच देशभरात इतरत्रही भाजप कार्यकर्ते आणि नेत्यांनी पक्षाचा स्थापना दिन साजरा केला.

**पुणे मनपा-रस्ते**

पुणे शहरात प्राधान्यक्रमाचे रस्ते स्वच्छ, खड्डेमुक्त करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आणि त्याचे सकारात्मक परिणाम आता दिसू लागले आहेत. या रस्त्यांवरून जाताना पुणेकरांचा प्रवासाचा वेळ वाचत असल्याचे महत्वाचे निरीक्षण पोलिसांच्या ITMS यंत्रणेने नोंदवल आहे. महापालिकेच्या या संपूर्ण उपक्रमाची माहिती उपायुक्त आणि पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी आकाशवाणीला दिली...

**पुणे महानगरपालिकेने एक अभियान हाती घेतले होते- "मिशन 15TH रस्त्याचं". म्हणजे, 15 रस्ते निश्चित केले गेले होते, जे रस्ते सर्वार्थाने चांगले करायचे होते. या रस्त्यांना समपातळीत करणे, खड्डे पडले असतील तर ते बुजवणे, फुटपाथ तुटले असतील तर ते नीट करणे, आणि डिव्हायडर दुरुस्त करणे-हे सर्व काम या अभियानांतर्गत करण्यात आले. या 15 रस्त्यांचे काम पूर्ण झाल्यानंतर आता ट्राफिक पोलिसांनी देखील सर्वेक्षण पूर्ण केले आहे. ATMH च्या माध्यमातून करण्यात आलेल्या या सर्वेक्षणात हे लक्षात आले आहे की, मागील सहा ते आठ महिन्यांपासून रस्त्यावरून जाताना जो प्रवासाचा वेळ असतो, तो वेळ या रस्त्यांवर फारच कमी झाला आहे. आणि थांबावे लागणारा स्टॉपेज टाइम देखील ड्रॅस्टिकली रिड्यूस झालेला आहे.**

**ऊसगाळप**

राज्यात मार्च अखेरच्या ऊस गाळप हंगामाच्या अहवालानुसार, 80 लाख मेट्रिक टन साखर उत्पादन झालं आहे. राज्यातल्या 200पैकी 189 कारखान्यांची धुराडी बंद झाली आहेत. सध्या केवळ 11 साखर कारखान्यांचा ऊस गाळप हंगाम सुरू आहे. गेल्या वर्षी याच दिवशी 1 कोटी 7 लाख 74 हजार मेट्रीक टन साखर उत्पादन झालं होतं; यंदा त्यात सुमारे 28 लाख मेट्रिक टनाची घट झाली आहे. तसंच इथेनॉल उत्पादनासाठी सुमारे 10 लाख टन साखर जाऊन 92 लाख मेट्रिक टन साखर उत्पादन हाती येण्याची अपेक्षा असल्याचं पुणे साखर आयुक्तालयानं म्हटलं आहे.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल हैदराबाद इथं झालेल्या सामन्यात गुजरात टायटन्सनं 153 धावांचं आव्हान पार करत सनरायझर्स हैदराबादचा सात गडी राखून पराभव केला.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र कोरडं हवामान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.